मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

शासन निर्णय- क्रमांक ग्रापंनि २०२०/प्र.क्र. २६ /पं.रा.-२

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,

मुंबई - ४०० ००१.

दिनांक : १३ जुलै, २०२०.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन राजपत्र सन २०२० चा अध्यादेश क्र.१०, दिनांक २५ जून, २०२०

प्रस्तावना :-

राज्यातील १९ जिल्हयातील १५६६ ग्रामपंचायतींची मुदत एप्रिल, २०२० ते जून, २०२० दरम्यान समाप्त झाली असून, १२६६८ ग्रामपंचायतींची मुदत जुलै, २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधी दरम्यान समाप्त होत असल्यामुळे मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर संदर्भाधीन अध्यादेशान्वये, प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याचे शासनाचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१०, दिनांक २५ जून, २०२० अन्वये नैसर्गिक आपत्ती किंवा आणिबाणी किंवा युध्द किंवा वित्तीय आणिबाणी किंवा प्रशासकिय अडचणी किंवा महामारी यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार पंचायतींच्या निवडणूका घेणे शक्य झाले नसेल तर राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेव्दारे अशा पंचायतीचा प्रशासक म्हणुन योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १५१ मधील पोट-कलम १ मध्ये, खंड (क) मध्ये तरतुद करण्यात आली आहे.

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणुन योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याचे शासन स्तरावरील अधिकार प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने संबंधित जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात येत आहेत.

संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणुन योग्य व्यक्तीची नियुक्ती संबंधित जिल्हयांचे पालकमंत्री यांच्या सल्ल्याने करुन ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज सुरळीत सुरु राहील याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर ज्या व्यक्तीची प्रशासक म्हणुन नियुक्ती करण्यात येईल अशा व्यक्तीकडून आपली कर्तव्ये पार पाडताना झालेल्या गैरवर्तवणूकीबद्दल किंवा कोणत्याही लांच्छनास्पद वर्तणुकीबद्दल अथवा कर्तव्यात दुर्लक्ष केल्याबाबत सदर व्यक्तीस पदावरून दुर करण्याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाविरुध्द आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या मुदतीत प्रशासकास शासनास अपील करता येईल.

प्रशासक नियुक्तीच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा वाद किंवा तांत्रिक अडचण उदभवल्यास त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार ग्राम विकास विभागास राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अरविंद कुमार)
अतिरिक्त मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,
४. मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव/ सचिव,
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
७. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव,
८. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक,
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३. सर्व गट विकास अधिकारी,
१४. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व उपायुक्त,
१६. विभागीय आयुक्त कार्यालय,
१७. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद,
१८. निवडनस्ती (कार्यासन पंचायत राज-२)

Scanned with CamScanner